# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**


**Case No: CGRF /AZ /U / 99 / 2008 / 20** **Date:-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri V.D.Trimbake of M/s Sachin Trimbake G-18, MIDC, Waluj ,Aurangabad. ( Consumer No. 490011112410)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri V.D.Trimbake of M/s Sachin Engineering , plot No. G-18, MIDC Waluj, Aurangabad, for passing interim order for not to disconnect electricity supply.

You are requested to submit your reply on the grievance.The **hearing is kept on 11.04.2008 at 16.00 hrs.**

**Encl As above**.

Copy to :
**Shri V.D.Trimbake of M/s Sachin Engineering ,**
**plot No. G-38, MIDC Waluj,**
**Aurangabad**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**(सीजीआरएफ/अेझेड/आर/१००/२००८/२१)**

**श्री सुभाषचंद भागचंद चोरडिया,**
**मु.पो.लासूर स्टेशन ता. गंगापूर,**
**जिल्हा औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र. ५०८८००००२५३६)**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत,**
**ग्रामीण मंडळ, औरंगाबाद.**

**विषय :- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक गा-हाणे निवारण मंच विद्युत लोकपाल)**
**विनीयम २००६,**

**दिनांक :- ११/०४/२००८**

## अंतरिम आदेश.

ग्राहकाने महावितरण कंपनीकडून चुकीच्या वीज बिलाबाबत तसेच कोणतीही पुर्वसुचना न देता वीज पुरवठा खंडीत केल्याबद्दल तक्रार दाखल केली आहे.

अर्जदाराच्या विनंतीवरुन अंतरिम आदेश पारीत करण्याबाबतची सुनावणी दिनांक ११/०४/२००८रोजी घेण्यात आली. नोडल अधिकारी श्री जैस्वाल, श्री मच्छिंद्र ना. ओव्हाळ, सहाय्यक अभियंता, व श्री व्हि. वाय. देशमुख, सहाय्यक लेखापाल, तसेच ग्राहक श्री सुभाषचंद भागचंद चोरडिया, सुनावणीच्या वेळी हजर होते.

सुनावणीच्यावेळी नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या सी.पी.एल वरुन ग्राहकास नविन मीटर रिडिंगप्रमाणे बिल देण्यात आले नसल्याचे आढळुन आले त्याचप्रमाणे ग्राहकाने काहीप्रमाणात त्याला देण्यात आलेल्या सरासरीवर आधारीत बिलापोटी रक्कम भरल्याचे दिसून येते. ग्राहकाचा वीज पुरवठा हा कोणतीही पुर्वसुचना न देता खंडित करण्यात आला आहे जे वीज कायदा २००३ मधील कलम ५६ मधील तरतुदी विरुध्द आहे.

**वरील निरीक्षणावरुन महावितरण कंपनीने, ग्राहकाचा वीज पुरवठा दिनांक १५/०४/२००८ पर्यंत पुनर्जोडणी करुन द्यावा असा अंतरिम आदेश मंच पारीत करीत आहे.**

हा आदेश या गा-हाण्याबाबत मंचचा अंतिम निर्णय होईपर्यंत लागू राहील.वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय गो. जोशी** | **विष्णु अ. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

**<u>२००८/२१</u>**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF /AZ /R /100 / 2008 / 21** **Date:-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Rural Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding a copy of the consumer's letter dated 09.05.2008 in case of **Shri Subhashchand B.Chordia,**Lasur Station, Gangapur, Dist. Aurangabad(Consumer No.**508800002536**)

**Dear Sir**

In this case the Forum has passed the Interim Order on dated 11.04.2008 and directed the Distribution Licensee not to disconnect the supply and issue revised bill. Revised bill issued by the Assistant Engineer, Sub Division, Gangapur is not acceptable to the consumer. A copy of the letter received from consumer on this revised bill is enclosed herewith.

The hearing in the matter is kept on dated 13.05.2008 at 13.15 Hours.

**Encl As above**.

Copy to :
**Shri Subhashchand B.Chordia,**
**Lasur Station, Gangapur,**
**Dist. Aurangabad**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/आर/१००/२००८/२१**

**तक्रार दाखल दिनांक ;-०८/०४/२००८**
**निकाल दिनांक ;- ०३/०६/२००८**

**श्री सुभाषचंद भागचंद चोरडिया,**
**मु.पो.लासूर स्टेशन ता. गंगापूर,**
**जिल्हा औरंगाबाद.**

अर्जदार/ग्राहक

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ग्रामिण मंडळ, औरंगाबाद.**

**विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६च्या अंतर्गत गा-हाणे.**

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार

दाखल केली आहे. अर्जदाराने दिनांक ०८/०४/२००८ रोजी दाखल केलेल्या गा-हाण्याची प्रत दिनांक ०८/०४/२००८ रोजी औरंगाबाद ग्रामिण मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन) व नोडल अधिकारी, यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले.

१) ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.
अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीनुसार त्यांनी लासुर येथे आपल्या दुकानासाठी महावितरण कंपनीकडुन वीज पुरवठा घेतला आहे. त्यांना चुकीचे बिल आकारून त्यांच्या विजपुरवठा खंडित करण्यात आला होता. त्या विरूध्द त्यांनी मंचात दिनांक ०८/०४/२००८ रोजी तक्रार दाखल केली होती मंचाने या तक्रारीवर दिनांक ११/०४/२००८ रोजी अंतरिम आदेश पारीत करून अर्जदारास कोणतीही पुर्वसुचना न देता खंडीत केलेला वीज पुरवठा पुनर्जोडणी करून देण्याचा आदेश दिला व अर्जदाराची तक्रार आय.जी. आर. सी. मध्ये दाखल करून तक्रार सोडविण्याचा आदेश दिला. त्यानंतर महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास रूपये ८०००/- चे सुधारीत वीज बिल देण्यात आले पण ते मान्य नसल्यामुळे अर्जदाराने मंचात तक्रार दाखल केली आहे.

**२)** दिनांक १३/०५/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री चोरडीया तसेच नोडल अधिकारी श्री जे.जी.जैस्वाल हजर होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदारास देण्यात आलेल्या सुधारीत वीज बिल रूपये ८०००/-ची प्रत दाखल केली. सुनावणी दरम्यान मंचाने या सुधारीत वीज बिलाचे विवरण मागितले असता ते नोडल अधिका-याकडे नसल्यामुळे त्यांनी सुनावणी पुढे वाढविण्याची विनंती मंचास केली. मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करून पुढील सुनावणी २०/०५/२००८ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३)दिनांक २०/०५/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री ओव्हळ उपस्थित होते त्यांनी मंचात बिल रिव्हीजन शिट दाखल केले व अर्जदारास रूपये २६०१-४०/- क्रेडीट दिल्याचे सुनावणी दरम्यान सांगितले. अर्जदाराने सदरील बिल रिव्हीजन हे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी वीज बिलापोटी आतापर्यंत २८०००/- रूपये भरल्याचे सांगितले. अर्जदाराच्या सी.पी.एल.वरुन प्राथमिक निरीक्षणात अर्जदाराने वरील प्रमाणे रक्कम भरली असल्याचे आढळुन आल्यामुळे नोडल अधिकारी यांच्या प्रतिनिधीस सुधारीत बिल पुन्हा तपासून ३० तारखेच्या आत मंचात दाखल करण्याचे सांगण्यात आले व प्रकरण निकालासाठी राखुन ठेवण्यात आले.

४)मंचात दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागदपत्रावरून असे आढळुन येते की, अर्जदाराचे वीज मिटर चोरीला गेल्यानंतर दिनांक १४/११/२००२ रोजी नवीन मिटर बसविण्यात आले. त्यांचे मिटर व्यवस्थित पणे वीज वापराची नोंद घेत असतांनासुध्दा त्यांना सरासरीवर आधारीत बिल आकारण्यात येत होते. अर्जदाराने केलेल्या तक्रारीची दखल न घेता दिनांक २७/०३/२००८ रोजी कोणतीही पुर्वसुचना न देता अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. अर्जदाराने दिनांक ०८/०४/२००८ रोजी मंचात तक्रार दाखल केल्यानंतर व मंचाने पारीत केलेल्या अंतरिम आदेशानंतर अर्जदाराचा वीज पुरवठा पुनर्जोडणी करून देण्यात आला.

महावितरण कंपनीने अर्जदारास दिनांक २४/०४/२००८ रोजी ८०००/- रूपये चे सुधारीत बिल दिले ते अर्जदारास मान्य नसल्यामुळे त्यांने याबाबत मंचात पुनः तक्रार दाखल केली. दिनांक २०/०५/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी महावितरण कंपनीच्या सुधारीत बिलाचे पुनर्लोकन करण्यास सांगण्यात आले व त्याप्रमाणे नोडल अधिकारी यांच्या प्रतिनिधीने बिल रिव्हीजन दाखल केले.

५) नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या सी. पी. एल. चे अवलोकन केल्यावर असे आढळुन येते की, अर्जदाराचे मिटर हे डिसेंबर २००१ मध्ये चोरीला गेल्यानंतर ते १४/११/२००२ मध्ये बदलण्यात आले पण अर्जदारास नवीन मिटर वरील नोंदीप्रमाणे वीज बिल न आकारता चालु रिडींग व मागील रिडींग ही ७२५० अशी दाखवत सरासरीवर आधारीत बिल देण्यात आले. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीनुसार त्याचा वीज बिलबाबतची तक्रार ही नवीन मिटर लावल्यापासून म्हणजेच १४/११/२००२ च्या पुढील कालावधीची आहे.अर्जदाराने डिसेंबर २००१ चे मिटर वरील नोंदीप्रमाणे त्यांना देण्यात आलेले रूपये ५५०/- चे बिल भरलेले आढळुन येते.तसेच मार्च,जुन,सप्टें. २००२ ची बिले वीज मिटर नसताना देण्यात आलेली आहेत. मार्च २००२ व त्यापुढील कालावधीसाठी महावितरण तर्फे अर्जदाराच्या बिलाचे सी.पी.एल वरून अवलोकन केले असता त्यास खालील प्रमाणे वीज बिल आकारण्यात आल्याचे दिसुन येते.

| कालावधी | मागिल रिडींग | चालु रिडींग | वीज वापर | शेरा |
|---|---|---|---|---|
| मार्च २००२ ते जुन २००२ | ७२५० | ७२५० | ५१ | सरासरीवर आधारीत |
| सप्टेबर २००२ ते जुन २००३ | ७२५० | ७२५० | ६१ | सरासरीवर आधारीत |
| ऑगष्ट २००३ते डिसेंबर२००३ | ७२५० | ७२५० | ७३ | सरासरीवर आधारीत |
| फेब्रु.२००४ते जुन २००४ | ७२५० | ७२५० | ८७ | सरासरीवर आधारीत |
| ऑगष्ट २००४ ते डिसें. २००४ | ७२५० | ७२५० | १०४ | सरासरीवर आधारीत |
| फेब्रुवारी २००५ ते एप्रिल २००५ | ७२५० | ७२५० | १२४ | सरासरीवर आधारीत |
| जुन २००५ ते ऑक्टो. २००५ | ७२५० | ७२५० | ३०० | सरासरीवर आधारीत |
| डिसेबर २००५ | ७२५० | ७२५० | ४०० | सरासरीवर आधारीत |
| जाने. २००६ ते फेब्रु. २००६ | ७२५० | ७२५० | २०० | सरासरीवर आधारीत |
| मार्च २००६ | ७२५० | ७२५० | १०२०० | सरासरीवर आधारीत |
| एप्रिल २००६ ते जुन २००६ | ७२५० | ७२५० | २०० | सरासरीवर आधारीत |
| जुलै २००६ | ७२५० | ७२९९ | ४९ | मिटरवरील नोदीप्रमाणे |
| ऑगष्ट २००६ते मार्च २००७ | ७२९९ | ७२९९ | १७५ | सरासरीवर आधारीत |
| एप्रिल २००७ नोव्हेबर २००७ | ७२९९ | ७५३९ | -- | मिटरवरील नोंदीप्रमाणे |
| डिसेंबर २००७ ते फेब्रु. २००८ | ७५३९ | ७५३९ | २९ | सरासरीवर आधारीत |

६) नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या मीटर बदलीच्या अहवालाचे निरिक्षण केल्यावर अर्जदाराकडे दिनांक १४/११/२००२ रोजी ५१४९२३७ क्रमाकांचे मीटर लावण्यात आले व तेव्हा मिटरवरील रिडींग ही ००००३ अशी होती दिनांक २७/०३/२००८ रोजी थकीत बिलापोटी अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. तेव्हा मिटरवरील रिडींग ही ०२९६७ अशी होती.यावरून १४/११/२००७ ते २७/०३/२००८ या काळात अर्जदाराचा एकूण वीज वापर हा २९६७ वजा ०००३ बरोबर २९६४ युनिट असा आढळुन येतो.

७) मिटरवर रिडींग उपलब्ध असतांना सतत ५ वर्षे अर्जदारास रिडींगप्रमाणे बिल न देता ते सरासरीवर आधारीत देण्यात आले. वीज बिलात लावण्यात आलेला सरासरी वापर हा देखील ५१ ते ४०० युनिट असा आढळुन येतो जो कोणत्या आधारावर आला हे समजणे सर्वसामान्य माणसाच्या व गणित शास्त्राच्या कक्षेबाहेर आहे. अशा प्रकारच्या वीज बिल आकारणीवरून महावितरण कंपनीने अर्जदारास थकबाकीदार घोषीत करून त्याला कोणतीही पुर्वसुचना न देता वीज पुरवठा खंडित केलेला आहे, जो वीज कायदा २००३ मधील कलम ५६ चे उल्लंघन आहे.

८) दिनांक १४/११/२००२ ते२७/०३/२००८या काळात अर्जदाराने २५०५३/-रूपये भरले असल्याचे सी.पी.एल. वरून स्पष्ट होते. अर्जदाराने या काळात केलेला एकूण २९६४ युनिट चा वीज वापर लक्षात घेता अर्जदाराने जास्त रक्कम वीज बिलापोटी भरल्याचे दिसत होते.

वरील निरिक्षणावरून मंच या प्रकरणी खालिल प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने १४/११/२००२ ते २७/०३/२००८ या काळाचे ४६ युनिट प्रतिमहा याप्रमाणे(विभागुन) सुधारीत बिल तयार करावे.

२) वरीलप्रमाणे तयार करण्यात आलेल्या सुधारीत बिलात कोणतेही व्याज व दंड लावू नये.

३) वरीलप्रमाणे तयार करण्यात आलेल्या वीज बिलाची एकूण रक्कम व अर्जदाराने भरलेली मार्च २००८ पर्यंतची रक्कम रूपये २५०५३/- याची वजावट करून अर्जदाराच्या नावावर येणारी क्रेडीट रक्कम द.सा.द.शेकडा ६/व्याजासहीत चेकद्वारे परत करावी

४) मार्च २००८ च्यापुढील वीज बिल मिटरवरील नोदींप्रमाणे आकारण्यात यावे त्यावर कोणतेही व्याज व दंड समाविष्ट करू नये.

५) सतत चुकीचे वीज बिल आकारून अर्जदाराचा वीज पुरवठा कोणतीही पुर्वसूचना न देता खंडीत करून कलम ५६ चे उल्लंघन केल्याबद्दल अर्जदारास मानसीक त्रास दिल्याबद्दल रूपये ५००/- नुकसान भरपाई ३० दिवसाच्या आत द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

**हेमंत अ. कापडिया**
**सदस्य**

**विजय गो. जोशी**
**सदस्य/सचिव**

**विष्णु अं. हंबिरे**
**अध्यक्ष**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

---

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

---

**क्र.सीजीआरएफ/एझेड/एयुआर/आर/१००/२००८/२१** **दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. ग्रामीण मंडळ, औरंगाबाद.**

**२) श्री सुभाषचंद भागचंद चोरडिया,**
**मु.पो.लासूर स्टेशन ता. गंगापूर,**
**जिल्हा औरंगाबाद.**

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/अेयुआर/आर/१००/२००८/२१ गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.

सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**